# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

| अ.क्र. | द्वितीय अपिल क्रमांक |
|---|---|
| १ | क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपील क्रमांक १९६३/२०२२/अहिल्यानगर ते १९७२/२०२२/अहिल्यानगर (एकूण १० द्वितीय अपिल) |

| अपिलार्थी |
|---|
| ॲड हरिष शरद भांबरे, रा.११९ अ, आनंद कॉम्प्लेक्स, सारसनगर, मु.पो.ता.जि.अहिल्यानगर ४१४००१. |
| **जन माहिती अधिकारी** |
| मुख्याध्यापक, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेज, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर. |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे एकूण १० इतकी द्वितीय अपिले दाखल केलेली आहेत. सदर द्वितीय अपिलांची दि.१३/०३/२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात येवून सुनावणीबाबत आयोगाकडून नोटीसद्वारे सर्व संबंधितांना रजिस्टर पोस्टाने कळविण्यात आले आहे. त्यानुसार दि.१३/०३/२०२६ रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन उपस्थित आहे तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी वर नमूद सर्व १० द्वितीय अपिलांमध्ये प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांनी ७४ दिवस उलटून गेले तरी आज दि.०१/०४/२०२२ पर्यंत अपिलाचा निर्णय आला नाही असे कारण नमूद केले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन आम्हाला सर्व माहिती मोफत देण्यात यावी आणि माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) व २० (२) नुसार कारवाई करावी अशी विनंती केली आहे.

२. अपिलार्थी यांनी एकूण १० माहिती अर्जांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०१/०१/२००० ते दि.३०/१०/२०२१ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१) आपल्या शाळेला दि.०१/०१/२००० ते दि.३०/१०/२०२१ रोजीपर्यंत जे सर्व अनुदान आले आहे त्याची तपशिलवार माहिती देणे.

२) आपल्या शाळेला दि.०१/०१/२००० ते दि.३०/१०/२०२१ रोजीपर्यंत जे सर्व अनुदान खर्च केले त्याची तपशिलवार माहिती देणे.

३) आपल्या शाळेने जे सर्व शासनाच्या परवानग्या घेतल्या आहेत त्याची झेरॉक्स प्रती मिळाव्यात.

४) आपल्या शाळेची मालमत्तेची तपशिलवार माहिती देणे.

५) शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी ज्या सुधारणा दिल्या जातात त्याची तपशिलवार माहिती देणे.

६) आपल्या शाळेमध्ये कोणत्या वर्गासाठी किती फी आहे याची माहिती मिळावी.

७) आपल्या शाळेच्या इमारतीची बांधकाम परवाना व ब्यु प्रिंटची झेरॉक्स मिळावी.

८) आपल्या शाळेमध्ये जे सर्व वहया, पुस्तके, ड्रेस, बुट व इतर कुठल्याही वस्तू विकतात त्याची तपशिलवार माहिती देणे.

९) सन २००५ ते आजरोजीपर्यंत आपल्या शाळेला जे तक्रार अर्ज आले आहेत त्याची झेरॉक्स प्रती मिळाव्यात.

१०) आपल्या शाळेला आपल्याकडे जे शिक्षक कामाला आहेत त्याची तपशिलवार माहिती देणे, त्यांचा पगार, कामाला लागल्याची तारीख, कॅटेगरी, जात आणि पद इ.

३. तद्नंतर माहितीसाठी एकूण प्रती व त्यास प्रत्येकी रु.२/- व एकूण रक्कम कळविणे अपेक्षित होते परंतू तसे न करता दिशाभूल करण्याचे काम करत आहे. त्यामुळे ती देण्यास माहिती अधिकारी हे टाळाटाळ करत असल्याचे दिसत आहे तरी माहिती ही कलम ७(६) नुसार मोफत मिळावी असे कारण नमूद करुन प्रथम अपिल दाखल केलेली आहेत.

४. सुनावणीवेळी उपस्थित असलेले विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांनी दि.०१/०१/२००० ते दि.३०/१०/२०२१ पर्यंत अशा एकूण २२ वर्षांची माहिती मागितली आहे. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दि.१०/०१/२०२२ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती / उत्तर देण्यात आलेली आहेत.

१) सदरची माहिती ही विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे कार्यालयीन वेळेत येऊन आपण स्वत: पाहणी करु शकता, आपणास मोजकी कागदपत्रे हवी असल्यास फी भरुन झेरॉक्स प्रती देण्याची व्यवस्था करण्यात येईल. तरी येण्यापूर्वी दोन दिवस अगोदर फोन करुन आल्यास माहिती पाहण्याची व्यवस्था करणे सोयीचे होईल.

२) आपल्या शाळेमध्ये कोणत्या वर्गासाठी किती फी आहे याबाबत विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक फी घेतल्या जात नाही असे कळविले आहे.

३) आपल्या शाळेची इमारतीची बांधकाम परवाना व ब्ल्यू प्रिंट बाबत शालेय मुलामुलींच्या संरक्षणाचा मुद्दा महत्वाचा असल्याने झेरॉक्स प्रती स्वरुपात माहिती देता येत नाही मात्र माहिती अधिकार कायद्यातील तरतुदीनुसार दाखवता येईल असे कळविले आहे.

४) आपल्या शाळेमध्ये जे सर्व वहया, पुस्तके, ड्रेस, बुट व इतर कुठल्याही वस्तू विकतात त्याबाबत शाळेत अशी कोणतीही विक्री होत नाही असे कळविले आहे.

५) आपल्या शाळेला जे तक्रार अर्ज आले त्याबाबत माहिती निरंक असल्याचे कळविले आहे.

६) आपल्या शाळेला आपल्याकडे जे शिक्षक कामाला आहेत त्यांचा पगार, कामाला लागल्याची तारीख, कॅटेगरी, जात व पद याबाबत ६८७० प्रतींसाठी रु.२/- प्रमाणे रु.१३५८०/- भरणा करणेबाबत कळविले आहे.

अपिलार्थी हे मागणी केलेल्या माहितीच्या अवलोकनासाठी उपस्थित राहिले नाही तसेच त्यांनी शुल्क देखील भरले नाही. सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (जे), ७(९) व २ (एफ) अंतर्गत कायदेशीररित्या नाकारलेली आहे. तसेच अपिलकर्त्याचे अर्ज अस्पष्ट, सर्वसमावेशक (omnibus) असून त्यामध्ये ठोस दस्तऐवज, विशिष्ट कालावधी किंवा फाईल क्रमांक नमूद नाहीत. असे अर्ज roving / fishing inquiry स्वरुपाचे असून ते माहिती अधिकार कायद्याच्या उद्देशाशी विसंगत आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने CBSE Vs Aditya Bandopadhyay (२०११) ८ scc ४९७ मध्ये स्पष्ट केले आहे की, माहिती अधिकार कायद्याचा वापर roving inquiry साठी करता येणार नाही. तसेच ICAI Vs Shaunak H. Satya (२०११) ८ scc ७८१ मध्ये ठरविले आहे की, माहिती मागणी विशिष्ट असावी, सार्वजनिक प्राधिकरणास माहिती संकलित किंवा निर्माण करण्यास भाग पाडता येत नाही. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती कर्मचारी, विद्यार्थी व त्रयस्थ पक्षाशी संबंधित असून ती वैयक्तिक व गोपनीय स्वरुपाची आहे. अपिलकर्त्याने कोणतेही मोठे सार्वजनिक हित (Larger Public Interest) सिध्द केलेले नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने Girish Ramchandra Deshpande Vs CIC, (२०१३) १ scc २१२ मध्ये ठरविले आहे की, वैयक्तिक सेवा नोंदी व शिस्तभंग विषयक माहिती ही कलम ८ (१) (जे) अंतर्गत वजावट पात्र आहे. Canara Bank Vs C.S.Shyam (२०१८) ११ scc ४२६ या प्रकरणाही हेच तत्व पुन्हा स्पष्ट करण्यात आले आहे. अपिलकर्त्यास अभिलेखांची Inspection देणे कायदेशीरदृष्टया मान्य होऊ शकत नाही. मागितलेले अभिलेख २२ वर्षांच्या कालावधीतील असून त्यामध्ये exempt व non-exempt माहिती परस्पर मिसळलेली आहे. निरीक्षणास परवानगी दिल्यास

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

कलम ८ (१) (जे) अंतर्गत वजावट पात्र माहिती अप्रत्यक्षपणे उघड होण्याचा धोका आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने CBSE Vs Aditya Bandopadhyay मध्ये स्पष्ट केले आहे की, जी माहिती थेट देता येत नाही ती निरीक्षणाद्वारेही देता येणार नाही. दिल्ली उच्च न्यायालयाने Naresh Trehan Vs Rakesh Kumar Gupta (२०१४) मध्ये ठरविले आहे की, वैयक्तिक व गोपनीय माहिती असलेल्या फाईल्सचे निरीक्षण देणे म्हणजे गोपनीयतेचा भंग होय. २२ वर्षांची जुनी, विखुरलेली व संकलित स्वरुपात न ठेवलेली माहिती शोधणे व तपासणे म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाच्या संसाधनांवर असम प्रमाणात भार टाकणे होय त्यामुळे सदर मागणी कलम ७ (९) अंतर्गतही नाकारण्यायोग्य आहे. एकाच विषयावर अनेक अर्ज दाखल करणे हे माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर व सार्वजनिक प्राधिकरणास त्रास देण्याचा प्रयत्न दर्शविते.

विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०७/०३/२०२२ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये अपिलकर्ता यांना मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती १० दिवसांत विनामूल्य पुरवावी. नव्याने मुद्रीत किंवा टंकलिखित करुन देणे अपेक्षित नाही. उपलब्ध माहितीच्या झेरॉकस प्रती पुरविण्यात याव्यात असे प्रथम अपिल आदेश पारित केलेले आहेत.

आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे व झालेल्या युक्तीवाद विचारात घेता, वर नमूद द्वितीय अपिलांमध्ये खालीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास येते.

५. अपिलार्थी हे व्यवसायाने वकील आहेत. अपिलार्थी यांच्या सर्व माहिती अर्जांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विहित नमुन्यात माहिती अर्जाबाबतचा विशिष्ट विषय नमूद करुन माहिती अर्ज सादर केल्याचे दिसून येते. यावरुन अपिलार्थी यांनी जाणुनबुजून शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना त्रास देण्याच्या हेतूने माहिती अर्ज दाखल करीत असल्याचे स्पष्ट होते. अपिलार्थी यांनी आपल्या माहिती अर्जांचा मोठया प्रमाणात वर्षाव करुन विस्तृत स्वरुपाची माहिती मागवून शासकीय यंत्रणेचा बेपर्वा वापर करण्याचा प्रयत्न केलेला आहे हे स्पष्टपणे दिसून येते. अपिलार्थी यांचे सर्व माहितीचे अर्ज विचारात घेता, अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली माहिती पुरवितांना / संकलित करतांना मोठया प्रमाणात मनुष्यबळ वळवावे लागते. त्यामुळे इतर कार्यालयीन कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होतो. वारंवार एकाच विषयाचे माहिती अर्ज सादर करुन शासकीय यंत्रणेस वेठीस धरण्याचा अपिलार्थी यांचा हेतू असल्याचे यावरुन स्पष्ट होते. त्यामुळे शासकीय कामात अडथळा निर्माण होतो व अशा प्रकारची माहिती संकलित करण्यासाठी / पुरविण्यासाठी शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होतो.

६. माहिती अधिकार कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा मुख्य उद्देश हा कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरिकांना माहिती मिळावी व जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे सार्वजनिक प्राधिकरणातील संबंधित शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडून प्राप्त माहिती अर्जांवर अधिनियमान्वये कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या / संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

७. एकाच व्यक्तीने असंख्य संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/अपिले करणे माहिती अधिकार कायद्याच्या प्रयोजनात अभिप्रेत/अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास/प्राधिकरणास वेठीस धरत असून त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अपिलार्थी यांच्या अशा अमर्यादित स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडून सदर शासकीय कार्यालयांकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे, त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

८. अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (माहिती अधिकार) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक आहे किंबहुना असेच कायद्यास अभिप्रेत आहे. कोणताही अधिकार हा अमर्याद स्वरुपात कोणत्याही कायद्याच्या व्यवस्थेत (Legal System मध्ये) असू शकत नाही. कारण अमर्याद अधिकार याचा वापर अमर्याद जबाबदारी निर्माण करील, अशी आयोगाची धारणा आहे, परंतु अपिलार्थी यांनी माहिती अधिकार कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी उपयोग केल्याचे दिसून येते. परिणामी सार्वजनिक प्राधिकरणांवर अमर्याद जबाबदारी निर्माण होत आहे.

९. अपिलार्थी यांनी एका प्राधिकरणाकडे/कार्यालयाकडे एका पेक्षा जास्त माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सार्वजनिक प्राधिकरण हे आपले दैनंदिन कामकाज सांभाळून माहिती अधिकारात माहिती देण्याचे अतिरिक्त काम करतात. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कमल ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अर्जावर ३० दिवसांत कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र एकाच प्राधिकरणाकडे एकाच दिवशी एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर या सर्व अर्जांवर ३० दिवसांच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करणे शक्य होत नाही. अशा

मोठ्या प्रमाणावर अर्ज करणाऱ्या व्यक्तीमुळे माहितीचा अर्ज करणा-या गरजू अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोध निर्माण होतो, असे आयोगाचे स्पष्ट मत आहे.

१०. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी तिच्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासने व त्यांचा यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे अन्य सार्वजनकि हितसंबंधांना तसेच शासनांचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषिय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शांची परमोच्चता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विवक्षित माहिती पुरविण्याकरीता तरतूद करणे इष्ट आहे, म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

११. आयोगाच्या मते अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी/सार्वजनिक प्राधिकरणांकडे वारंवार अशा प्रकारचे माहिती अर्ज करुन अतिविस्तृत, दिर्घ कालावधीची, मोघम स्वरुपाची माहितीची मागणी केल्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा बेदरकारपणे दुरुपयोग होऊन निश्चितपणे सार्वजनिक प्राधिकरणाने करावयाच्या कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होणार आहे.

१२. अपिलार्थीमार्फत आयोगाकडे प्राप्त द्वितीय अपिलांची संख्या/उपरोक्त आकडेवारी पाहता, अपिलार्थी यांनी विविध सार्वजनिक प्राधिकरणांकडे द्वितीय अपिलांपेक्षा अधिक प्रमाणात माहिती अर्ज व प्रथम अपिले दाखल केले असल्याची शक्यता नाकारता येणार नाही.

१३. तसेच अशा प्रकरणासंबंधात मा. सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९/०८/२०११ रोजी Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. मध्ये खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquillity and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or

intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where 75% of the staff of public authorities spend 75% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला/नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडून प्राप्त माहिती अर्जांवर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

१४. तसेच अपिलार्थी यांचा माहिती अर्ज पाहता, त्यांनी अत्यंत विस्तृत व मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. याबाबत मा. उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र. २०१८२, दिनांक २७/०१/२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly would help the citizens to become more informed. If no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

१५. अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या सर्व द्वितीय अपिल प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, नमूद करण्यात येते की, याबाबत केंद्रीय माहिती आयोगाने एस.के.लाल विरुध्द रेल्वे मंत्रालय (अपील क्र. सीआयसी/ओके/ए/२००६/००२६८-२७२, दिनांक २९.१२.२००६) प्रकरणात संबंधित अपिलार्थीने रेल्वे प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या पाच माहिती अर्जाद्वारे रेल्वे विभागाच्या विविध सेवा व कर्मचारी वर्ग

यांची संपूर्ण/सर्व अभिलेखे याबाबत माहिती मागितल्या प्रकरणी निकाल पारित करताना खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविलेले आहे.

"माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा जरी नागरीकांना, कलम ८ अन्वये वगळण्यात आलेल्या १० बाबीशिवाय इतर, अशी कोणतीही माहिती प्राप्त करुन घेण्याचा अधिकार प्रदान करीत असला तरी, याचा अर्थ असा नव्हे की, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी अशा प्रकारच्या क्षुल्लक व अर्थहीन माहिती अर्जांची दखल घ्यावी."

१६. याबाबत केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/२०१२/०००८५८-SA ते ०००८७२-SAसंदर्भात दिनांक ०४/०७/२०१४ रोजी पारीत केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**<u>Earlier Observation of CIC : Shri.M.M.Ansari</u>**

In several occasions earlier the Central Information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar Vs NFL, Panipat, (Decision No. 246/IC(A)2006, F No. CIC/MA/A/2006/00374 & 375 dated 28 Auguest 2006) the applicant sought documents and specific comments of CPIO on 89 queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of selfinterest, rather than public interest, was dominant, as the appellant had sought redressed of grievances.

**IN Shri Gopal Soni Vs The New India Assurance Company Ltd** (F.No. CIC/AT/A/2008/00097, 000116,000124, dated 12.6.2008) learned Commissioner Shri. A.N. Tiwari dealt with similar problem. The respondents in the case submitted that the appellant, their employee, was suspended for insubordination and misconduct,and ever since be directed a spate of application containing queries for detailed, voluminous but inane information which would have to be collected and collated from over 30 branches. The Commission held in this case "answering the elaborate and detailed queries, which have to be both accurate and authentic, imposs heavy cost on the public authority and tends to divert its recourses, which brings it within the scope of section 7(9) of RTI Act".

१७. अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उपयोग कायदेशीर हत्यार म्हणून करीत आहे. जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/SG/C/2011/000760, CIC/SM/2011/000926/SG, CIC/SM/A/2011/001111/SG, CIC/SM/A/2011/002909, dated 17 th January, 2012) in a second appeal " The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can

be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information.....At this juncture the Commission would like to mention that the Right to Information is a fundamental right of the citizens, it cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual in the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him...... The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission, is wasting public resources."

१८. मा.उच्च न्यायालय, कर्नाटक खंडपीठ धारवाड येथील रीट पिटीशन क्र.१०१२६०/२०२४ संदर्भात दि.२५/०९/२०२४ रोजी दिलेल्या निर्णयात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

The present case is a classic example of how indiscriminate use of the RTI Act can adversely affect public administration. The petitioner's actions, if allowed to continue, would not only waste valuable public resources but would also delay the processing of genuine RTI applications filed by citizens seeking information in good faith.

Upon considering the facts and circumstances of this case, along with the relevant judicial precedents, this Court is of the opinion that the petitioner has clearly misused the provisions of the RTI Act. The Petitioner's conduct in filing thousands of RTI applications across multiple departments, without any legitimate reason or cause, constitutes an abuse of the process of law. The petitioner's request to withdraw the writ petition without paying the requisite court fees is not acceptable, as it would set a dangerous precedent and encourage further misuse of the RTI Act.

In light of the petitioner's failure to pay the requisite court fees, and considering the abuse of the legal process in this case, this court is not inclined to entertain the petitioner's request to withdraw the writ petition without addressing the deficit court fee. Allowing such a withdrawal would set a harmful precedent and could encourage others to misuse legal provisions without facing any consequences. The writ petition is devoid of merits and is liable to be dismissed.

१९. तसेच नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी/प्रकटीकरण हे त्यांच्या अंतस्थ व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत

हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

२०. माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी, अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय द्वितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर द्वितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व मा. केंद्रीय माहिती आयोगाकडील निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांची दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या/प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे. या सर्व बाबींचा अपिलार्थी यांनी विचार करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींमुळे सर्वसाधारण जनतेचे कामकाज थांबते व त्यांचे शासकीय कार्यालयातील कामकाज न झाल्यामुळे सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करावा लागतो. अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा दुरुपयोग होऊन जनतेच्या पैशाचे अतोनात नुकसान होत असून माहिती अधिकार कायद्याचा सर्रासपणे वारेमाप माहिती अर्ज करुन दुरुपयोग करणे ही बाब आयोग मुकपणे सहन करणार नाही. याबाबत आयोग कडक शब्दांत निंदा करीत आहे. आयोग खेदाने नमूद करतो की, अधिनियमात मोठया प्रमाणावर माहिती अर्ज करुन अतिविस्तृत, अर्थहीन, तथ्यहीन, मोघम स्वरुपाची माहिती मागणी करणा-यांवर कोणतीही कार्यवाही करण्याची तरतूद नाही. त्यामुळे अपिलार्थीचे द्वितीय अपिले फेटाळण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. अपिलार्थी हे उच्चशिक्षित व व्यवसायाने वकील असतांना त्यांनी आतापर्यंत वारंवार केलेले माहिती अर्ज पाहता, त्यांचे वर्तन अशोभनीय व अवांछनीय असून याबाबत आयोगाकडून त्यांना सक्त ताकीद देण्यात येते की, यापुढे असे द्वितीय अपिले केल्यास त्यांच्या द्वितीय अपिलांची आयोग कोणतीही दखल घेणार नाही.

उपरोक्त नमूद सर्व बाबी विचारात घेता आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) अपिलार्थी हे व्यवसायाने वकील असल्याचे दिसून येते.

२) अपिलार्थी यांनी विस्तृत, मोघम व दीर्घ कालावधीची माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(९) नुसार अशी माहिती पुरविण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाचे मनुष्यबळ मोठया प्रमाणात वळवावे लागणार असल्यामुळे अशी माहिती देणे अभिप्रेत नाही.

३) अपिलार्थी यांनी सर्व माहिती अर्जामध्ये माहितीशी संबंधित कालावधी दि.०१/०१/२००० ते आजरोजी पर्यंत असा नमूद केलेला आहे मात्र एका माहिती अर्जामध्ये आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिलामध्ये २००५ ते आजरोजी पर्यंत असा कालावधी नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. त्यामुळे नेमकी माहिती दि.०१/०१/२००० पासून हवी आहे की २००५ पासून हवी आहे याबाबत कोणताही बोध होत नाही.

४) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे दिसून येते.

५) अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांच्या अनुषंगाने संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय पारित केल्याचे दिसून येते.

६) अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विनामूल्य पुरविणे म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाच्या पर्यायाने जनतेच्या पैशाचा दुरुपयोग होईल.

७) अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी वापर करत असून शासकीय अधिकारी / कर्मचारी / कार्यालय यांना वेठीस धरीत असल्याचे स्पष्ट होते.

८) अपिलार्थी यांचेकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा अमर्याद व अवाजवी वापर करणे हे वर्तन अशोभनीय असल्याचे स्पष्ट होते.

९) अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (माहिती अधिकार) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक आहे किंबहुना असेच कायद्यास अभिप्रेत आहे. कोणताही अधिकार हा अमर्याद स्वरुपात कोणत्याही कायद्याचा व्यवस्थेत (Legal System मध्ये) असू शकत नाही. कारण अमर्याद अधिकार याचा वापर अमर्याद जबाबदारी निर्माण करील अशी आयोगाची धारणा आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अधिकार कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी उपयोग केल्याचे दिसून येते. परिणामी सार्वजनिक प्राधिकरणांवर अमर्याद जबाबदारी निर्माण होत आहे.

१०) अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही शिक्षकांची वैयक्तिक व गोपनीय स्वरुपाची माहिती असून ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसून येते.

११) अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक स्वरुपाची मागणी केलेली माहितीबाबत कोणते सार्वजनिक हित साध्य होणार आहे त्याबाबत काहीही सिध्द केल्याचे दिसून येत नाही.

१२) अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही २२ वर्षांची माहिती असल्याने तिचा शोध घेवून तपासून द्यावी लागणारी माहिती असल्याचे दिसून येते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (९) नुसार अशी माहिती देणे अभिप्रेत नाही.

१३) अपिलार्थी यांनी माहिती अर्जामध्ये कोणत्याही विशिष्ट कालावधीतील ठोस दस्तऐवज अथवा फाईल क्रमांक नमूद केलेले नसून मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते.

१४) अपिलार्थी यांनी माहिती मागणी करतांना विशिष्ट स्वरुपाची व सार्वजनिक प्राधिकरणास संकलित करावी लागणार नाही अशी माहिती मागणे अपेक्षित आहे.

१५) अपिलार्थी यांनी एकाच दिवशी संबंधित प्राधिकरणाकडे एकूण १० माहितीचे अर्ज दाखल करुन सुमारे २२ वर्षांची माहिती मागितली असून संबंधित प्राधिकरणाच्या जन माहिती अधिका-यांना ती माहिती ३० दिवसांत देणे शक्य होणार नाही.

१६) उपरोक्त विवेचनांवरुन सर्व द्वितीय अपिले फेटाळणे क्रमप्राप्त आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांची वर नमूद एकूण १० द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र.- 2639 दिनांक 06 APR 2026